# **<u>ई-निविदा सूचना</u>**

## **<u>अमरावती जिल्हयातील रेती घाटांचा लिलाव (दुसरा टप्पा- पहिली वेळ)</u>**

## **ई-निविदा/ लिलाव-सन २०१५-२०१६**

जाहीर सुचना देण्यांत येते की, **<u>अमरावती जिल्हयातील ८ तालुक्यातील दुसऱ्या टप्प्यातील २० रेतीघाटाचे ई-टेंडरींग ई-ऑक्शन, पर्यावरण विभाग (मुंबई) च्या अनुमतीच्या अधिन राहून करण्यांत येत आहे.</u>**

(अ) सदर लिलाव हे पर्यावरण अनुमतीच्या अधिन राहून करण्यात येत असून पर्यावरण अनुमती प्राप्त न होणा-या गटात उत्खननास परवानगी देण्यात येणार नाही.

(ब) पर्यावरण अनुमतीस विलंब झाला तरी सदरचे लिलाव हे दिनांक ३० सप्टेंबर,२०१६ पर्यंतच्याच कालावधी करीता राहतील.

(क) एखाद्या गटास पर्यावरण अनुमती प्राप्त झाली नाही, तर लिलावाधारकास फक्त त्याने भरलेली १/४ रक्कम परत करण्यात येईल. त्याकरिता लिलावधारकास कोणताही दावा/व्याजाची मागणी करता येणार - नाही.

(ड) पर्यावरण अनुमती प्राप्त होताच लिलाव अंतिम केल्यानंतर लिलावाच्या बोली प्रमाणे उर्वरीत ३/४ रक्कम भरुना घेऊन लिलावधारकास वाळू/रेतीगटाचा ताबा देण्यात येईल. लिलावाची कार्यवाही करतांना ज्या वाळु गटांना पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त झाली त्या वाळु गटांच्या ई-टेंडरींग-ई-लिलावानंतर प्राप्त सर्वोच्च बोलीची रक्कम मंजुर करण्यांत येईल. वाळूघाट लिलाव पर्यावरण विभागाच्या मंजूरीचे अधिन राहून करण्यात येत आहे. ज्या घाटांना पर्यावरण मंजूरी मिळणार नाही, त्याची लिलाव मंजूरी रद्द करण्यात येईल.

सा २०१५-१६ करिता दि. ३०/०९/२०१६ पर्यंतच्या मुदतीसाठी ई-निविदा निर्गती करणेसाठी <u>https://eauctioncollamr.abcprocure.com</u> या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. तसेच ई-लिलावाकरीता <u>https://www.eauctioncollamr.abcprocure.com</u> या वेबसाईटचा उपयोग करावा. सदर वेबसाईटची लींक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावतीच्या amravati.nic.in या वेबसाईटवर देण्यात आलेली आहे. इच्छूक कंत्राटदारांना ई-निाविदा व ई-लिलावात भाग घेणेसाठी विनंती करण्यात येत आहे.

रेती घाटाचे ई-टेंडरींग करते वेळी सर्व प्रथम जिल्हा, व्दितीय उपविभाग व तद्नंतर तालुकावार आलेल्या अपसेट किंमती पेक्षा जास्त रक्कम प्राप्त झाल्यास त्या किंमतीस अनुकमे प्रथम/व्दितीय/तृतीय प्राधान्य देण्यांत येईल. अशा प्रकारची बोली प्राप्त न झाल्यास वाळुघाट निहाय प्राप्त ई-टेंडर व ई-लिलावाला नियमाुसार मंजुरी प्रदान करण्यांत येईल. ई-टेंडरिंग उघडल्यांतर उच्चतम प्राप्त रक्कमे वरुन त्या रेतीघाटाचा ई-लिलाव सुध्दा घेण्यात येईल. त्या लिलावात उच्चतम बोली बोलणा-याचे नावे तो रेती घाट मंजूर करण्यात येईल. मात्र सदरच्या जाहीर लिलावास फक्त त्या त्या रेती गटाचा ई-टेंडर भरणा-यांनाच भाग घेता येईल, इतरांना भाग घेता येणार नाही. ई-लिलावात बोली न आल्यास ई-टेंडरच्या उच्चतम देकार स्वीकारण्यात येईल.

ई-निविदा व ई-लिलाव प्रक्रीयेत भाग घेण्याकरीता इच्छुक कंत्राटदाराना उपरोक्त वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नोंदणी करीता डिजिटल सिग्नेचर सर्टीफीकेट अनिवार्य आहे. निविदेचा नमूना, प्रतिज्ञापत्र, रेती घाट यादी, अटी व शर्ती, रु. ६५३९/- (१० लाखा पेक्षा कमी किमतीच्या रेती घाटा करीता रु. ३५३९/-) (ना-परतावा) टेंडर फी अधिक प्रोसेसिंग फि ऑन-लाइन जमा केल्यानंतर निविदाधारकाला संकेतस्थळावरुन ऑनलाईन ई-निविदा खरेदी करता येईल. रेती घाटा संबंधीची विस्तृत माहिती उपरोक्त वेबसाईटवर तसेच जिल्हाधिकारी कार्यालय, संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिल कार्यालयात उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**ई -टेंडर व ई-लिलाव करणेसाठी वेळपत्रक खालील प्रमाणे आहे.**
**(दुसरा टप्पा- पहिली वेळ)**

| दिनांक | तपशील |
|---|---|
| १०.०२.२०१६ | सकाळी १०.०० वाजे पासून बिडर रजिस्टेशन ऑन-लाईन (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| १७.०२.२०१६ | सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निविदाधारकाचे ऑनलाईन रजिस्टेशन करणे (संगणकीय नोंदणी) बंद होईल. |
| १२.०२.२०१६ | सकाळी १०.०० पासून निविदाधारकास ऑनलाईन ई-निविदा भरणे (संगणकीय नोंदणी) सुरु होईल. |
| २२.०२.२०१६ | सायंकाळी ५.०० वाजता ई-निविदा ऑनलाईन पध्तीने (संगणकीय) स्वीकारणे बंद होईल. |
| २३.०२.२०१६ | सकाळी १० वाजता पासुन गट केलेल्या व त्यामधील प्रत्येक रेती स्थळांचे ई-निविदा जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील सभागृहात डाऊनलोड करुन उघडण्यात येईल. |
| २४.०२.२०१६ | ई-ऑक्शन (ई-लिलाव) खालील प्रमाणे करण्यात येईल.<br>गट (लॉट) क्रमांक- १ सकाळी ९.०० ते १०.०० वाजेपर्यंत.<br>गट (लॉट) क्रमांक- २ ते ६ सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत.<br>गट (लॉट) क्रमांक- ७ ते २६ सकाळी १.०० ते ३.०० वाजेपर्यंत.<br>(वेळ समाप्तीचे वेळी बोली आल्यास संगणकीय प्रणाली व्दारे प्रत्येकी १० मीनीट प्रमाणे फक्त ३ (तिन) वेळा वाढ करण्यात येईल). लिलावाची बोली (Increment amount) कमीतकमी अपसेट प्राईजच्या १ टक्के (पूर्णांकात) वाढीव दराने असून अमर्यादित असेल. त्यानंतर ई-लिलाव बोली उघडण्ययात येईल. |

टिप-गट (लॉट) निहाय रेतीघाटाची माहिती उपरोक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.
संपर्क दूरध्वनी/ भ्रमणध्वनी- +९१ ७९४००१६८३५, ८३७, ८६७, ८०२, ८७९, ८८६, ८६५, ८८३, ८५२, ८२३, ८९१, फॅक्स- +९१ ७९४००१६८७९.
ई-मेल- support@abcprocure.com व support@abcprocure.com आहे.
रजिस्ट्रेशन तसेच डिजिटल सर्टिफिकेट बाबत संपर्काकरीता भ्रमणध्वनी क्रमांक ०७९४००१६८६६, ०९०९९०९०८३० ई-मेल info@abcprocure.com

जिल्हाधिकारी अमरावती